जगभर

# तुर्कस्तान : कुर्द, इराण

चन्द्रशेखर पुरन्दरे

**तुर्कस्तान : कुर्द**

सीरियातील अरब वसंतापासून सुरू झालेली यादवी, तुर्कस्तानमधील जूनमधील सार्वत्रिक निवडणुका व इराक-सीरियामधील इस्लामिक स्टेट ही अतिविकृत हिंसाचारी सुन्नी इस्लामी संघटना यावर अलिकडेच विस्ताराने लिहिले आहे. (तरीही पुढे जागोजागी गोषवारा आहे.)

आता तुर्कस्तान या तांडवात कुर्द लोकांविरुद्ध उतरला आहे. त्यामुळे तो प्रदेश अधिक झपाट्याने हिंसाचाराकडे जात आहे. कुर्द लोक तुर्कस्तान, सीरिया, इराक व इराणमध्ये संलग्न प्रदेशात आहेत. त्या प्रदेशाचे त्यांना स्वत:चे स्वतंत्र राष्ट्र करायचे आहे. उत्तर इराकमध्ये पहिल्या इराक युद्धानंतर (१९९१) त्यांना स्वायत्त प्रदेश मिळाला तो अमेरिकेच्या सद्दाम हुसेनविरुद्धच्या हस्तक्षेपाने. पण इतर देशांत ते अल्पसंख्य आहेत व त्यांची अवहेलना आणि छळ होतो. कारण ते मुस्लिम असले तरी वंशाने तुर्क (तुर्कस्तान), अरब (सीरिया-इराक) किंवा पर्शियन (इराण) नाहीत. त्यांच्या परंपरा, श्रद्धा निराळ्या आहेत. इराकमधल्यासारखाच स्वायत्त प्रदेश त्यांना गेली ३५ वर्षे तुर्कस्तानमध्येही हवा आहे. त्यासाठी हिंसक आंदोलनेही झालेली आहेत. त्यांना दडपशाहीने दाबणे हा तुर्कस्तानचा आजवर प्रयत्न होता. मात्र गेल्या दोन वर्षांपासून या प्रश्नावर वाटाघाटी व सामोपचाराने तोडगा काढावा असा प्रयत्न सुरू झाला. जूनमधील निवडणुकांत त्यांना प्रथमच संसदेत काही जागा मिळाल्याने अधिकृत राजकीय पक्ष अशी ओळख मिळाली. त्यामुळे ही वाटाघाटींची प्रक्रिया पुढे जाईल अशी आशा निर्माण झाली.

पण या जागा मिळाल्याने अध्यक्षाच्या महत्त्वाकांक्षेला तडा गेला. सध्याचा अध्यक्ष (आधीचा पंतप्रधान) एर्दोगान याची एकाधिकारशाहीकडे वाटचाल गेली काही वर्षे चालू आहे. अध्यक्ष हे शोभेचे पद असूनही त्याला पंतप्रधानाची सत्ता त्या पदासाठी हवी आहे. त्यासाठी घटनादुरुस्ती जरूरी आहे. ही घटनादुरुस्ती त्याचा पक्ष लोकसभेत बहुमतात असला तरच शक्य आहे. हे बहुमत त्याला अलिकडच्या निवडणुकीत अपेक्षित होते. ते कुर्द पक्षामुळे त्याच्या हातातून निसटले. कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने दोन-तीन पक्षांनी एकत्र येऊन आघाडीचे सरकार स्थापन करावे हा प्रयत्न सुरू झाला. तो असफल करणे म्हणजे नव्या निवडणुका घेता येतील असा एर्दोगानचा डाव होता. तो यशस्वी होऊन आता निवडणुका नोव्हेंबरमध्ये होतील. त्या निवडणुकांत आपला पक्ष स्पष्ट बहुमतात असणे एर्दोगानला आवश्यक आहे.

या निवडणुकांसाठी 'तयारी' म्हणून आता कुर्द लोकांवर अचानक युद्ध लादण्यात आले. तात्कालिक कारण म्हणजे जुलैमध्ये अतिरेकी कुर्दांनी दोन तुर्की पोलीस ठार मारले. त्याबरोबरच इस्लामिक स्टेटने प्रथमच तुर्कस्तानच्या भूमीवर त्यांचे काही सैनिक ठार मारले आणि तुर्कस्तान या संघर्षात ओढला गेला किंवा त्यात त्याने प्रवेश केला.

**इतर मध्यपूर्वेतील परिस्थिती**

सीरियातील राजवट व तिचे विरोधक यांच्या यादवीत जवळजवळ निम्म्या देशावर कोणाचीच सत्ता नाही. यादवी नसली तरी शिया-सुन्नी संघर्षामुळे हीच परिस्थिती इराकमध्ये आहे. या संलग्न प्रदेशातील सत्तेच्या पोकळीत स्टेट जन्माला आले. अल्-कईदाने तेथे बीजे पेरली होतीच, तोच प्रकल्प स्टेट पुढे नेत आहे.

स्टेट फक्त त्या भूभागावर (इराक-सीरिया-जॉर्डन वगैरे) खिलाफत स्थापन करून थांबणार नाही. त्यांचा मोहरा पश्चिमेकडेही वळायला सुरुवात झाली आहे. त्यांच्या जगभरातून येणाऱ्या स्वयंसैनिकांपैकी अनेक अमेरिका, ब्रिटन, फ्रान्समधील धर्मांतरित गोरेही आहेत. त्यामुळे अमेरिकेच्या पुढाकाराने पाश्चात्त्य देश स्टेटला नष्ट करायला हवाई हल्ले करत आहेत. NATO (North Atlantic Treaty Organization)चा सभासद या नात्याने या आघाडीत तुर्कस्तानने सहभाग घ्यावा असा आग्रह ही आघाडी दोन वर्षांपूर्वीपासून करत आहे. आजवर तुर्कस्तानने त्याला दाद दिली नाही. मात्र आता जनमानस कुर्द अल्पसंख्यांकांविरुद्ध वळत आहे हे हेरून पुढच्या निवडणुकीच्या आशेने एर्दोगानने ही संधी ओळखली व तुर्कस्तान आघाडीत दाखल झाला आहे.

या नवीन सहभागानुसार आता अमेरिका स्टेटवर हल्ले करण्यासाठी तुर्कस्तानमधील हवाई तळ वापरते. (अमेरिकेचे पायदळ हल्ल्यांमध्ये सामील नाही.) आजवर कुवेत, जॉर्डन, इराकमधील हवाईतळ वापरण्यात येत होते. पण ईप्सित भूभागाला तुर्कस्तानचे हे तळ अधिक जवळ आहेत. या नव्या आघाडीने या प्रदेशातील हिंसाचार, दग्धभू, निरपराधांचे हकनाक बळी आणि राजकीय गुंतागुंत वाढली आहे. त्यासाठी कोण कोणाविरुद्ध लढत आहे ही समीकरणे पाहू -

सीरियन हुकूमशहा बशर असादला लोकांची लोकशाहीची मागणी अमान्य असल्याने त्याने आपल्याच लोकांवर चालू केलेल्या हिंसाचारात गेल्या साडेचार वर्षांत २.५ ते ३ लाख निरपराध मृत्युमुखी पडले आहेत तर त्याच्या दहापट विस्थापित झाले आहेत. एकट्या तुर्कस्तानमध्येच १५ लाख सीरियन निर्वासित असावेत, इतर इतरत्रच्या देशांमध्ये. मग आधीचे अहिंसक विरोधक हिंसक बनले. पण त्यांच्यात एकवाक्यता नाही. त्यांना राजवटीविरुद्ध लढायला परदेशातून शस्त्रास्त्रे व पैसाही मिळाला नाही. राजवट शिया असल्याने तिला इराण, हेझबोल्ला या संघटित सशस्त्र शक्तींचा व रशियाचा पाठिंबा आहे. विरोधकांना सौदी अरेबियासारख्या पण तुरळक सुन्नी राजवटींचा अपुरा पाठिंबा. देशात मोठ्या प्रदेशात अराजक माजणे हा या संघर्षाचा परिणाम झाला. त्यात वर म्हटल्याप्रमाणे इस्लामिक स्टेट जन्मले. ही या विभागातील तिसरी व वाढती शक्ती.

कुर्द लोक सीरियन सरकार, इराकी सरकार, सीरियन विरोधक व स्टेट यांच्याविरोधात आहेत कारण त्यांना जो प्रदेश स्वायत्त म्हणून हवा आहे, तोच या शक्तींनाही हवा आहे. पाश्चात्त्य हवाई छत्राखाली आपल्या उत्तर सीरियातील प्रदेशातून स्टेटला हुसकावून लावण्यात कुर्द आतातरी यशस्वी झाले आहेत. पण ही परिस्थिती बदलू शकते.

याच प्रदेशातून तुर्कस्तानातील कुर्द लोकांना फूस व मदत मिळते व ते तुर्कस्तानमध्ये हिंसाचार करतात हा तुर्कस्तानचा दावा आहे. त्यामुळे कुर्द आता तुर्कस्तानच्याही विरोधात आहेत. आजवर ते स्टेटविरुद्ध मैदानात होते. आता तुर्कस्तानने अमेरिकेच्या बरोबरीने पदार्पण केल्याने समीकरण बदलत आहे. कारण तुर्कस्तानचे लक्ष्य स्टेटपेक्षा कुर्द आहेत.

स्टेट आणि सीरियन सरकार अर्थातच या सगळ्यांच्याच विरोधात आहे.

एर्दोगानचे लक्ष पुढच्या निवडणुकांवर आहे. कुर्द या तुर्कस्तानविरोधी समूहाला नेस्तनाबूत करण्याचे श्रेय मिळाले तर त्याचा पक्ष बहुमताने सत्तेवर येईल ही त्याची आशा आहे. फसव्या भावनिक राष्ट्रवादाचा राजकारणी अशा वेळी फायदा घेतात. पुढचा उद्देश अर्थातच त्याला तुर्कस्तानचा सर्वेसर्वा बनण्याचा आहे.

या 'सगळेच सगळ्यांच्या विरुद्ध' हिंसाचारात मानवी हानी अपरिमेय दिसते.

**इराणचा अणुप्रकल्प**

इराणच्या अणुप्रकल्प महत्त्वाकांक्षेला आळा घालण्याच्या एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय करारावर १४ जुलैला स्वाक्षऱ्या झाल्या. एका बाजूला इराण व दुसऱ्या बाजूला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीचे देश (अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स व ब्रिटन), जर्मनी व युरोपियन युनियन यांच्यात हा करार झाला. त्या अन्वये पुढची १०-१५ वर्षे इराण अण्वस्त्रे बनवणार नाही. इराण ती छुपेपणाने बनवणार नाही यासाठी त्याच्या अणुप्रकल्पावर आंतरराष्ट्रीय निरीक्षकांची नजर राहील. त्या बदल्यात गेली अनेक वर्षे इराणवर असलेले व्यापारी निर्बंध उठवण्यात येतील. मात्र, इराण तरीही अण्वस्त्रनिर्मिती करत आहे हे उघड झाले तर निर्बंध परत लागू होतील.

या करारामुळे इराणमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. निर्बंधांमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात इराण अस्पृश्य झाला होता. त्याचे परदेशी बँकांतील १०० बिलियन डॉलर्स तेव्हापासून गोठवण्यात आले आहेत. ते पैसे आता मोकळे होतील. तेल व नैसर्गिक वायू यांच्या उत्पादनाची यंत्रणा अनेक वर्षे आधुनिकीकरणाच्या प्रतिक्षेत आहे. आधुनिकीकरणानंतर त्या निर्यातीवर प्रचंड परकीय चलन मिळणे सुरू होईल. इतरही अनेक उद्योग आंतरराष्ट्रीय व्यापारात उतरतील. युरोप, चीन, रशियालाही उद्योगक्षेत्र, शस्त्रास्त्रांचा पुरवठा, तेल-गॅस विकत घेणे याची दारे खुली झाली आहेत. या देशांच्या मंत्र्यांनी व्यापारासाठी इराणच्या वाऱ्या सुरू केल्या आहेत. इराणचा शिक्षित मध्यमवर्ग व आठ कोटी लोकसंख्या ही आकर्षक बाजारपेठ आहे.

करार आताच होण्याचे कारण म्हणजे ओबामा राजवटीची कारकीर्द पुढच्या वर्षी संपेल. त्याआधी जागतिक राजकारणावर दीर्घकालीन ठसा उठवण्याची निकड आहे. त्या दिशेने ५४ वर्षे संपुष्टात आलेले अमेरिका-क्युबा संबंध पुन्हा प्रस्थापित झाले आहेत. गेली ३६ वर्षे इराणशी असणारे वैर या कराराने जरा कमी झाले आहे.

आणखी एक तात्कालिक कारण म्हणजे सीरिया-इराकमध्ये होणारा कडव्या सुन्नी इस्लामी संघटनेचा - इस्लामिक स्टेटचा - उदय. त्याला विरोध हा अमेरिका व इराणचा समान धागा आहे. करार झाला तरी अमेरिका-इराण संबंध ताणलेलेच राहणार. करार फक्त अण्वस्त्रक्षमतेपुरता मर्यादित आहे. त्यामुळे इस्त्रायल व सौदी अरेबियासारख्या सुन्नी मुस्लिम देशात चिंतेचे वातावरण आहे. इस्त्रायलने तर हा करार ही ऐतिहासिक घोडचूक असल्याचे म्हटले आहे. इराणचा शिया विस्तारवाद आज इराक, सीरिया, येमेन, लेबॅननमध्ये आहे. तो या कराराने अधिक वाढेल ही भीती आहे.

'जग सुरक्षित करणे' हे कराराचे उद्दिष्ट सांगायला होते. मात्र त्या मागची कारणे आर्थिक व राजकीय आहेत. अर्थात तरी तो स्वीकारार्ह आहेच. पण जग सुरक्षित करणे हा खरा उद्देश असता तर अस्थिर व बेजबाबदार पाकिस्तान आणि उत्तर कोरियाकडे महासत्तांनी आधी लक्ष दिले असते. पण इराण त्यांच्याइतका दुबळा नाही आणि संभाव्य बाजारपेठही आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*